मराठी (प्रश्न-पत्र–II)

(साहित्य)

वेळ : तीन तास | कमाल अंक : 250

प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात

आठ प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

MARATHI (PAPER—II)

(LITERATURE)

Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 250

QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

Please read each of the following instructions carefully before attempting questions

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

Optional Province · optionalprovince.com

SECTION—A

1. पुढील पाच उत्ताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) याउपरि मागौतें कामाइसीं म्हणितलेंः 'भटो रावो मरैलः आणि मातें आगीआंतु घालीतीलः' भटोबासीं म्हणितलेंः 'तरि तुम्ही आपुला आदिभावो चुकवाः' 'मग ते बळाधिकारें घालीतीलः' 'तरि तुम्हा आत्महत्त्येचे नरक नाहीः' इतुलेनि ते उगींचि राहिलीः मग काही पदार्थ आणिला होताः तो भटोबासांसि संपादिलाः मग आज्ञा घेउनि गावां गेलीः ॥ मग कितीका दिसां रावो निवर्तलाः मग तेही लैसेचि केंलेंः बहुतापरि आपुला आदिभावो चुकवीलाः परी येरी बळाधिकारूचि केलाः

(b) आता आमच्या नीतिमान धार्मिक सरकारने केवळ धर्मलोभ एकीकडे ठेऊन शेतकऱ्यांचे आचरणावर डोळा ठेवण्याकरिता डिटेक्टिव्ह डॉक्टरांच्या नेमणूका करून शेतकऱ्यांनी आपल्या गैरशिस्त आचरणावरूनी प्रकृति बिघडविल्यास व चोऱ्या छिनाल्या वगैरे नीच आचरण केल्यास त्यांस योग्य शिक्षा करण्याविषयी चांगला बंदोबस्त केल्याविना ते नीतिवान होणे नाहीत.

(c) ज्यांना कुठल्याही तऱ्हेची जवळीकच नको वाटते असेही काही असतीलच की जगात. आणिक जवळीक झाल्याखेरीज त्यांना कसं उमजणार की हे नको मला म्हणून? मनात आलं. एक क्रांती व्हायला हवी—सगळ्या या समाजमान्य पद्धती बदलणारी.

(d) ध्येय असलेली मंडळी अनेक शतकांनी होणारी गोष्ट करण्यास हात घालतात. त्यांच्या आयुष्यात तर काहीच होत नाही, आणि त्यांच्या बायकांमुलांना मात्र त्यांचे ध्येयवादित्वाचें फल भोगावे लागते.

(e) अरे तुम्ही सारे सरकारचे जावई! उगीच गपचीप जे दिले ते खाण्यापेक्षा किरकिर का करायचं? तुम्हाला सरकारनं सारं दिलंय आता फक्त पोरी देयाच्या राहिल्यात.

2. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) नागदेवाचार्यांच्या ठिकाणी असणाऱ्या बुद्धी व भावना यांचे मनोज्ञ मिश्रण आणि त्यांच्या बुद्धिमत्तेची अनुभूती कशाप्रकारे येते? 'स्मृतिस्थळ' मधील विविध प्रसंगांच्या आधारे विशद करा. 15

(b) 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकाच्या लेखनामागील महात्मा जोतीराव फुले यांची विचारधारा स्पष्ट करा. 15

(c) सामाजिक भूमिकेतून कौटुंबिक भावनांचे विश्लेषण श्री. व्यं. केतकरांनी कशारीतीने केले आहे? 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीतील घटना-प्रसंगांच्याद्वारे उलगडून दाखवा. 20

3. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'साष्टांग नमस्कार' या नाटकातील विनोदांचे विशेष उदाहरणे देऊन विशद करा. 15

(b) 'जेव्हा मी जात चोरली होती' या कथासंग्रहातील कथांमधून उद्याच्या सुंदर, निरामय आणि सशक्त जगाचे स्वप्न बाबुराव बागूल यांनी मांडलेले आहे; असे तुम्हास वाटते का? साधक-बाधक चर्चा करा. 15

(c) उद्धव शेळके यांच्या कथालेखनात अस्सल मानवतावादी जीवनदृष्टीची अनुभूती कशी येते, 'शिळान' या कथासंग्रहाच्या आधारे स्पष्ट करा. 20

Optional Province · optionalprovince.com

4. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'जन हे वोळतु जेथे' या कादंबरीतील पात्रांच्या संवाद-विसंवादातून समग्र मानवी जीवनानुभूतीचे प्रत्ययकारी दर्शन कशाप्रकारे होते? सविस्तर लिहा. 15

(b) आधुनिक जीवनजाणिवेने उपस्थित केलेले पेच उलगडून पाहण्याचा प्रयत्न गौरी देशपांडे यांनी केला आहे; असे तुम्हास वाटते का? सोदाहरण स्पष्ट करा. 15

(c) मराठवाड्यातील बोलीचे कोणकोणते विशेष प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणींचे पक्षी' मध्ये आढळतात, सोदाहरण स्पष्ट करा. 20

SECTION—B

5. पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) श्रीमुख साजिरे कुंडले गोमटी। तेथ माझी दृष्टी बैसलीसे॥ १॥
कटीवर कर समचरण साजिरे। देखावया झुरे माझे मन॥ २॥
माहेरीची आस दसरा दिवाळी। बाहे ठेवी निढळी वाट पाहे॥ ३॥

(b) राजे असाल तरि धन्य वसुंधरा हे।
शोभाल देव, तरि नाक यथार्थ आहे॥
भोगी तुम्ही उपजलां जरि नागलोकीं।
खाले असोनि सकळांवरि होय तो कीं॥

(c) कष्टाची बरि भाजिभाकरी तूप साखरेचि चोरि नको।
आल्या अतिथा मुठभर द्याया मागें पुढती पाहुं नको॥
दिली स्थिती देवानें तींनच मानी सुख कधिं विटू नको।
असल्या गांठी धनसंचय कर सत्कार्या व्यय हटू नको॥

(d) भर मार्गात कधी ऐकला तव मंजुळ गान
अडखळुनि थांबतो क्षणभर बेभान
शब्दाशब्दांच्या घटांतून ओसंडे भाव
पारिजातकाच्या फुलांचा कोमल वर्षाव !

(e) हा रस्ता अटळ आहे ! अटळ घाण सारी;
अटळ आहे शिसारी.
एक वेळ अशी येईल, घाणीचेच खत होईल
अन्यायाची सारीं शिते, उडतील पुन्हां;
होतील भुतें.

Optional Province · optionalprovince.com

6. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'आर्त मनाची उत्फुर्त भावकविता' म्हणून संत नामदेवांच्या अभंगवाणीचे परीक्षण तुमच्या शब्दांत लिहा. 15

(b) रघुनाथपंडितांच्या कल्पनाचातुर्याचा प्रत्यय 'दमयंती स्वयंवर' मध्ये कोणकोणत्या रीतीने येतो त्याचे उदाहरणांसहीत विवेचन करा. 15

(c) पैंजण मधील पोवाडे म्हणजे 'मराठयांचा काव्यमय इतिहास आहे' हे मत तुम्हास योग्य वाटते का? साधक-बाधक चर्चा करा. 20

7. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'एक निसर्ग कवी' या नात्याने बालकवींच्या कवितांचा परामर्श घ्या. 15

(b) ग्रेस यांच्या संध्याकाळच्या कवितेमध्ये आढळणाऱ्या गूढ प्रतिमांचा अन्वर्यार्थ उलगडून दाखवा. 15

(c) 'प्रीती' आणि 'क्रांती' यांचा उद्घोष करणाऱ्या कुसुमाग्रजांच्या 'विशाखा' मधील कवितांचा ऊहापोह करा. 20

8. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) कामगारांच्या जीवनानुभवांची यथार्थ आणि कलात्मक संघर्ष चित्रे नारायण सुर्वे यांनी कवितेतून कोणत्याप्रकारे रेखाटलेली आहेत, ते 'जाहिरनामा' मधील कवितांच्या आधाराने सांगा. 15

(b) सूक्ष्मनिरीक्षण, बुद्धिवादी दृष्टिकोण आणि विचारांची प्रखरता ही विंदा करंदीकरांच्या कवितेची वैशिष्ट्ये 'मृदगंध' मध्ये कशी दिसतात ते विशद करा. 15

(c) 'या सत्तेत जीव रमत नाही' या कवितासंग्रहाच्या शीर्षकाची यथार्थता ढसाळ यांच्या कवितांच्या आधारे स्पष्ट करा. 20

★ ★ ★

Optional Province · optionalprovince.com